# दिनांक ०५.०७.२०११ च्या जाहिरातीबाबत आक्षेप अर्जांवरील बृहतसूची समितीचा निर्णय

| अ. क्र. | आक्षेप घेणा-याचे नाव व पत्ता<br>आक्षेपाचे स्वरुप | वस्तुस्थिती | बृहतसूची समितीचा निर्णय |
|---|---|---|---|
| १ | श्री.रमणीकलाल बुटालाल सोलंकी<br>पत्ताः ५ए / २ टाटा पावर हाऊस, मागाठणे सं.शि, बोरीवली, मुंबई- ४०० ०६६. यांचे दिनांक २१/०७/२०११ रोजी प्राप्त झालेले पत्र.<br>१)उपरोक्त यादी संकेत स्थळावर व वृत्तपत्रात प्रसिध्द करताना दि.२४ मे,२०११ रोजी सामना वृत्तपत्रात व संकेत स्थळावर आपल्या कार्यालयाकडून प्रसिध्द केलेल्या यादीस आलेल्या हरकती व आक्षेप विचारात घेतल्याचे दिसून येत नाही.<br>२)सदर प्रसिध्द करण्यात आलेली यादी परिपूर्ण नसुन यादीत अनेक त्रुटी आढळून येतात. जसे की, अ)भाडेकरुंचे, जुन्या इमारतीतील नाव , ब)खोली क्रमांक, क)जुन्या इमारतीतील मुळ क्षेत्रफळ ड)व्हेकेशन नोटीस दिनांक ,इ)संक्रमण शिबीराचे नाव ई)बृहतसुची वरील पात्रता दिनांक इत्यादी, उदा.अनु क्रमांक १०१,१२४,१२८,१४९,२११,२२९,३०४ इत्यादी.<br>३)सदर यादीमध्ये काही भाडेकरु/ रहिवाशी यांच्या नावांचा दोन ते तीन वेळा उल्लेख आढळतो.उदा.अनु.क्र.१२, १३, व १४,२१७ व २१८, १९९-२००,१६३-२३५,१८०-२२८<br>४)अनुक्रमांक १६१ व १७७ यांना यापूर्वी सदनिकांचे वितरण व ताबा दिला असूनही सदर भाडेकरु पुन्हा बृहतसुचीवर दाखविण्यात आले आहेत, यावरुन अशा वितरण व ताबा झालेल्या भाडेकरुंचा सदर यादीत समावेश असण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>५)माहितीच्या अधिकारातील मिळालेल्या माहितीनुसार प्रसिध्द केलेल्या यादीमध्ये ना हरकत प्रमाणपत्रांतर्गत मंडळाला विकासकाकडून मिळालेल्या काही निवासी गाळयांचा सदर यादीत रिक्त गाळे म्हणून कुठेच उल्लेख दिसून येत नाही.<br>६)सदर यादीवरुन ही बाब स्पष्ट होते की, सदर यादी संशयास्पद असून, त्या यादीत संबंधित अधिका-यांनी संगनमत करुन बोगस | | (१)व (२)जाहिरातीमध्ये काही रकान्यात माहिती भरलेली नाही. याबाबत वितरण करतेवेळी मुळ नस्तीवरुन माहिती तपासून वितरण केले जाईल.<br>(३)जाहिरातीत दोनदा आलेली नावे फेरतपासणी करुन वगळण्यात येतील.<br>(४)अर्जदाराने आक्षेप घेतलेल्या सॅम्युअल स्ट्रिट वरील भाडेकरु/ रहिवाशी बाबत कोणतेही पुरावे दिले नाहीत. तसेच सुनावणी दरम्यान स्पष्टीकरण ही केले नाही.त्यामुळे याबाबत काहीही कार्यवाही अपेक्षित नाही.<br>(५)जाहिरात देतेवेळी कार्यकारी अभियंता यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार रिक्त गाळयांचा उल्लेख जाहिरातीत केला आहे.<br>(६) श्रीमती ज्योनिता लॉयल यांचे बाबत कार्यकारी अभियंता यांचेकडून मुळ क्षेत्रफळाबाबत खातरजमा करुनच नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | भाडेकरुंची नावे समाविष्ट केली असल्याबाबत खात्री होते. उदा.११७, सॅम्युअल स्ट्रीट मधील भाडेकरु तसेच दिनांक १४/०९/२०११ रोजीच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी जोनिता लॉयल यांचे क्षेत्रफळाची शहनिशा करण्याचा मुद्दा उपस्थित केला. | | |
| २ | श्रीमती हेमलताबेन नारायणी ठक्कर<br>पत्ता : बिल्डींग नं. १८५ [ब], खोली क्र.६८१९, कन्नमवार नगर - २, विक्रोळी [पूर्व], मुंबई- ४०० ०८३.यांचे दिनांक १९/०७/२०११ रोजी प्राप्त झालेले पत्र.<br>दिनांक ०५ जुलै २०११ रोजी नवशक्ती वृत्तपत्रातील जाहिराती मधील बृहतसुचीवरील घेण्यात आलेल्या भाडेकरु/रहिवासी यांच्या यादीमध्ये माझे नाव नाही असा अर्ज सादर करीत आहे.<br>१)व्हेकेशन नोटीस दि.१८/०७/१९७४<br>२)मुळ कागदपत्र दिनांक ११/०३/२००२ रोजी जमा<br>३)दि.११/०३/२००४ रोजी मंजुर झाली.<br>४)माझे क्षेत्रफळ ४९.९० चौ.मी.आहे. तसेच दि.१४/०१/२०१० रोजी केलेल्या अर्जाच्या वेळी माझे नाव समाविष्ट होते व आता आलेल्या जाहिराती मध्ये माझे नाव नाही. दिनांक १४/०९/२०११ रोजीच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी असे नमुद केले की, त्यांना पुनर्रचित इमारत योगेश्वर मध्ये ३ गाळे (प्रत्येकी २२५ चौ.फूट) चे देकारपत्र देण्यात आले. तथापि, त्यांनी देकारपत्रे स्वीकारली नाही कारण त्यांना जुन्या सदनिकेच्या बदल्यात एकच मोठा गाळा हवा आहे. तरी बृहतसुची यादीत नाव समाविष्ट करुन त्यांना अर्जानुसार प्राधान्यक्रमाने गाळा देण्यात यावा. | श्रीमती हेमलताबेन नारायणजी ठक्कर (सी-विभाग) यांच्या नस्तीची पडताळणी केली असता त्यांना बृहतसूची समितीने गाळा वितरणासाठी पात्र ठरविले आहे. त्यानुसार त्यांना योगेश्वर इमारतीत तीन गाळयांकरीता (२२५ चौ.फूट ) देकारपत्र दिले आहे. | श्रीमती हेमलताबेन नारायणजी ठक्कर यांना तीन गाळयांचे देकार पत्र देण्यांत आले होते. त्यामुळे प्राधिकरणाच्या ठरावाच्या निर्देशानुसार गाळा वितरण झालेल्यांचे नाव बृहतसूची पात्रता यादीत घेतले नाही. |
| ३ | सौ.शोभनाबेन कुलदीप भाटीया<br>पत्ता : २१/१०४८, मच्छिमार नगर, रहेजा हॉस्पीटल रोड, माहिम, मुंबई- ४०० ०१६. यांचे दिनांक १३/०७/२०११ रोजी प्राप्त झालेले पत्र.<br>१)म्हाडा ॲक्ट सेक्शन ९२ (२) मध्ये वितरण द्यावे असे स्पष्ट असूनही व विधी सल्लागार/प्राधिकरण यांचा होकारार्थी अभिप्राय असूनही गाळा देता येणार नाही. कारण इमारत अनधिकृत उभी | हाफिफा बेगम (ई विभाग), शेट्टी व नेवासकर यांच्या बाबतीत पूर्ण माहिती प्राप्त करण्यात येत आहे. तसेच श्रीमती हफिजा बेगम यांचे बाबतीत पुर्ण माहिती प्राप्त करण्यात येत आहे. | (१)सदर आक्षेप जाहिरातीशी संबंधित नाही.श्री. नेवासकर व श्रीमती पुष्पा शेट्टी यांना बृहतसूचीवरुन वितरीत झालेल्या एन.ओ.सी.गाळे वितरणाची चौकशी करण्यात येईल. तथापि त्याकरिता अर्जदारास बेकायदेशीर वितरण करणे योग्य होणार नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | आहे. मग माझ्या इमारतीतील रहिवासी सर्वश्री नेवासकर व शेट्टी यांना वितरण कसे केले ? याशिवाय अशाच अन्य प्रकरणात श्रीमती हफीफा बेगम, १८२-१८४ बाप्टी रोड, कामाठीपुरा, यांना २/२००९ मध्ये मलबारहिल येथे फ्लॅट दिला. या तिघांना कोणत्या कायद्याखाली वितरण केले ते स्पष्ट करावे.<br>२)होलचंद जवाहर चाळ, माधुस्कर रोड व ई माझेस रोड, वरळी या दोन्ही इमारतीतील पहिल्या सोडतीमधील १५ लोकांना वेटींग यादीत घेतले आहे. त्यांचे गाळे ब्रम्हसिध्दी-२, माटुंगा-१ हे गाळे प्रसिध्द केलेल्या यादीत नाहीत.अन्य इमारतीतील गाळे आपण तपासून प्रसिध्द करावेत.<br>३)टिप्पणी क्रमांक १३५.३ दिनांक २८/०१/२०११-नवी पॉलीसीतील आपली सुचना / पुनर्रचित इमारतीत किंवा ना हरकत गाळे बाबतीत वितरण देताना ५ टक्के पेक्षा अधिक (२२५ चौ.फूट + ५ टक्के) क्षेत्रफळाची सदनिका देता येणार नाही असे म्हटले आहे. शासनाने यापूर्वीच २६९ चौ.फूट ऐवजी ३०० चौ.फूट सदनिका मिळणेस मंजुरी आहे असे जाहिर केले. नवीन पॉलीसी प्रपोज्ड पत्रात ५ टक्के अधिक क्षेत्रफळ द्यावे अशी सूचना आहे. परंतु त्या पॉलीसीस शासनाची मंजुरी नाही. म्हणून ५ टक्के वाढीव क्षेत्रफळास रहिवाशांचा विरोध राहील.<br>४)पुनर्रचित इमारतीतील अतिरिक्त गाळे (वरील टिप्पणी मध्ये) बृहतसूचीवरील रहिवासी यांना पुनर्रचित इमारतीतील अतिरिक्त गाळे म्हाडा ॲक्ट ९२ (२) खाली देता येतात. आपल्या टिप्पणीत असे निश्चित धोरण नाही असा उल्लेख आहे. म्हणून वरील सूचना केली.<br>५)०६/१२/२००८ पत्रकांत ना हरकत गाळयांचे नियम :- ना हरकत दोन्ही गाळे वितरण यादीतील रकान्यांचे शिर्षक भिन्न आहेत. एका यादीत ज्येष्ठतेप्रमाणे मार्क आहेत तर दुस-या यादीवरुन ज्येष्ठतेचा बोध होत नाही. या कारणामुळे वितरण यादी सदोष दर्शविते. त्यामुळे अर्जदारांनी आक्षेप नोंदविला. त्यावर आपण निर्णय दिला नाही. दुसरे मुख्य कारण अर्जदारांच्या इच्छेविरुध्द वाटप झाले ते सुध्दा शांती टॉवरचे गाळे रिक्त ठेवून. आपण आक्षेपास उत्तर न | | (२) इतर सर्व आक्षेप हे सुस्पष्ट नाहीत. तथापि यापुढील गाळे वितरण हे प्राधिकरणाच्या ठरावानुसारच होईल.<br>(३) ते (६) प्राधिकरणाच्या निर्णयानुसार २२५ चौ.फुटापेक्षा कमी क्षेत्रफळाचे गाळे मुंबई मंडळाकडे वर्ग करावयाचे आहेत तथापि बृहतसूचीवरील भाडेकरु/रहिवाशी यांना जाहिरातीव्दारे एकदा संधी देऊन गाळे वितरीत करणे अपेक्षित आहे.<br>(७)शांती टॉवर मधील रिक्त गाळयांचा समावेश जाहिरातीमध्ये आहे. |

२१/३१२

| | | | |
|---|---|---|---|
| | देता नवीन पॉलीसी खाली प्रकरण रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचे ॲफिडेव्हीट मध्ये म्हटले आहे. परंतु ते कोणास कळविले नाही.<br>६) पत्र दि.०६/१२/२००८ स्वेच्छा निर्णयांतर्गत १० टक्के सदनिका प्रसिध्दी पूर्वी राखून ठेवणेबाबतः- अशा सदनिकांचे वितरण करताना बृहतसूचीवरील कोणीही रहिवासी अर्ज करु शकतो अशी त्याच पत्रांत तरतूद असताना, रहिवासी यांना अंधारात ठेवून वितरण केले. मुळात १० टक्के शब्द म्हाडा कायद्यात वितरणाबाबतीत नाही. त्यास शासनाची मान्यता हवी आहे. तसेच असल्याबद्दल खुलासा केलेला नाही.<br>७)महत्वाची बाब आक्षेपः- आपली जाहिरात ही प्रॉपर्टी विषयी आहे. या प्रकरणांत कोण अधिकृत आणि कोण अनधिकृत हे जाणून घेण्यापेक्षा आपल्याकडे पुरेसे रेकॉर्ड आहे. आक्षेपावरुन माहिती मागविणे हा जीवन मरणाचा खेळ आहे. आपल्याकडे गुप्त बातमी ठेवण्यात तशी रचना/तरतुद नाही. (जशी पोलीस खात्यात खब-यांना संरक्षण आहे) कमीटीत उच्च शिक्षीत लोक असताना याचा विचार झाला नाही हे दुर्दैव आहे.<br>आपण बारकाईने वरील बाबीचे निरीक्षण केले तर अर्जदारांच्या पहिल्या विनंती मागणीत काय चुकते ? आजही शांती टॉवर मधील गाळे खाली आहेत. न्यायालयीन प्रकरणात आपण होकारार्थी अभिप्राय देवून न्यायालयाचा वेळ वाचवून प्रकरण निकाली काढू शकता. दिनांक १४/०९/२०११ रोजीच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी असा आक्षेप नोंदविला की जुनी इमारत २१ सी गोला लेन खोली क्रं १५ चे हक्कापोटी त्यांचे वडिल तथा मुळ भाडेकरु यांची वारस या नात्याने गाळा वितरणाकरीता त्यांनी कागदपत्रे सादर केली आहेत. सदर जुन्या इमारतीचे जागी आता नविन अनधिकृत इमारत उभी असून त्यात नविन भाडेकरु आहेत. तर मुळ भाडेकरु संक्रमण शिबीरात आहेत. त्यातील दोन मुळ भाडेकरुंना बृहतसुचीवरुन वितरण कसे केले. ? | | |

DyCO/RT

१५३/१५४

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जेकब अपार्टमेंट को-ऑप. हाऊसींग सोसायटी लि.<br>पत्ता : प्लॉट नं.४३९, बाबुराव परुळेकर मार्ग, दादर [ प ], मुंबई-४०० ०२८.यांचे दिनांक १५/०७/२०११ रोजी प्राप्त झालेले पत्र.<br>आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, रुम नं.१०५ :- श्रीमती स्वाती कृष्णा धाकवल यांना ताबा पावती क्रं दु व पु/उमुअ/पु.गा./मि.व्य./यु -२१३७/१० दिनांक ०२/०६/२०१० रोजी ताबा दिला आहे.<br>रुम नं.३०६ :- श्रीमती गंगुबाई गंगाराम बंदिल यांना ताबा पावती क्रं दुवपु/उमुअ/पु.गा./मि.व्य./यु-४९७२/०८ दि.२१/११/२००८ रोजी ताबा दिला आहे. सदर बाबत पडताळणी करुन आपण आपल्या रिक्त सदनिका मधून हया सदनिका वगळाव्यात ही विनंती. | ना हरकत गाळे वितरण नोदवही तपासली असता गाळा क्र. १०५ व ३०६ जेकब अपार्टमेंट अर्जदाराच्या म्हणण्यानुसार वितरीत झाल्याचे दिसून येते. | आक्षेप अर्जानुसार जेकब अपार्टमेंटमधील गाळा क्रं. १०५ व गाळा क्रं. ३०६ यांचे वितरणाची खात्री झाल्याने सदर गाळे जाहिरातीतून वगळण्यात आले आहेत. |
| ५ | १)श्री. शिवाजी पांडूरंग शेलार<br>पत्ता : २/५१, अनंत निवास, अनंत मालवणकर मार्ग, लालबाग, मुंबई-१२ व २)श्री महेंद्र केशव कांबळे,<br>पत्ता:- ८/८१, कन्नमवार नगर सं.शि., विक्रोळी (पूर्व), मुंबई:- ४०० ०८३.<br>३)श्री.रमणिकलाल बुटालाल सोळंकी,<br>५/०२, मागाठाणे सं.शि., बोरीवली (पूर्व), मुंबई:- ४०० ०६६.<br>४)श्रीमती गुणाबाई भिकू इंगवले<br>टी२६/२०७, प्रतिक्षा नगर सं.शि., सायन (पूर्व), मुंबई:- ४०० ०२२..यांचे दिनांक २९/०७/२०११ रोजी प्राप्त झालेले पत्र.<br>१)अन्यायकारक जाहिरात :- सदर जाहिरात काढून मंडळ आमच्यावर अन्याय करीत आहे. कारण आम्ही सर्व अर्जदार हे एन.ओ.सी. गाळयांच्या वितरणाबाबत काढण्यात आलेल्या जानेवारी २००९ मधील पहिल्या यादीचे अर्जदार आहोत. एन.ओ.सी. मधील पहिल्या यादीत एकूण अर्जदार संख्या २५ व मंडळाकडे उपलब्ध गाळे ६८ असताना देखील मंडळाने आम्हांला आजपर्यंत गाळे वितरण केलेले नाही. सदर यादीकरीता अर्जदारांकडून पसंती मागविण्यात आलेली होती. परंतु मंडळाच्या अधिका-यांनी स्वतःचे हित संबंध पाहुन तसेच मूळ धोरण बाजूस सारुन आपल्या जवळील | अनेक भाडेकरु/रहिवासी यांची नावे अनावधानाने दोनदा आली आहेत. गणेश रामचंद्र खैरे यांची नस्ती पडताळणी करण्यात आली आहे. त्यानुसार श्रीमती रेणुका गणेश खैरे एनओसी इमारतीत गाळा वितरीत झाला आहे. | आता प्राधिकरणाचे दि. ०३.०३.२०११ चे बृहतसूची वितरण धोरण प्रसिध्द झाले असून त्या धोरणानुसारच वितरण होईल. तसेच दोनदा आलेली नावे वगळून वितरण करण्यात येईल.<br>आक्षेप घेतलेल्या श्री. गणेश रामचंद्र खैरे यांचेबाबत पडताळणी केली असता असे आढळले की, श्रीमती रेणुका गणेश खैरे यांना एन.ओ.सी. इमारतीत गाळा वितरीत झालेला आहे. सबब श्री.गणेश रामचंद्र खैरे यांचे नाव बृहतसूचीवरुन वगळण्यात आले आहे. ना-हरकत प्रमाणपत्रांतर्गतच्या गाळयांची जाहिरात कार्यालयातील उपलब्ध अभिलेखावरुन देण्यात आलेली आहे. ना-हरकत प्रमाणपत्रांतर्गतच्या गाळयांचे सर्वेक्षण करुन उर्वरित सर्व रिक्त गाळे पुढील जाहिरातीत घेण्यात येतील. |

अर्जदारांना गाळा वितरण केले. परंतु आम्हांला हेतुपरस्पर गाळा वितरण टाळले गेले. एन.ओ.सी. गाळा पहिल्या यादीला देखील आलेलया काही अर्जदारांकडून आक्षेप नोंदविले गेले. परंतु मंडळाच्या अधिका-यांनी सदर आक्षेप बाजूला सारुन आपल्या मर्जीतल्या लोकांना गाळा वितरण केले.

तसेच आमच्यातील काही अर्जदारांनी डिसेंबर २००९ रोजी काढलेल्या एनओसी गाळा दुसरी यादीमध्ये देखील अर्ज केले. त्यातही मंडळाच्या अधिका-यांनी आम्हांला "Already allotted hence taken in next merit list" असा चुकीचा शेरा मारुन डावलले. याबाबत आम्ही सर्वांनी या दुस-या वितरण यादीवर पहिल्या यादीत वितरण न मिळाल्याने आक्षेप अर्ज नोंदविले. आक्षेप अर्जांवर मंडळाच्या अधिका-यांनी पत्र पाठवून दि.२५/०८/२०१० रोजी सहमुख्य अधिकारी/दु व पु यांच्या दालनात बैठक आयोजित केली. परंतु सदर बैठक मंडळाच्या अधिका-यांनी कोणतेही कारण न देता रद्द केली. व नजिकच्या काळात पुन्हा बैठकीला बोलावले जाईल, असे तोंडी आश्वासन सहमुख्य अधिकारी/दु व पु यांनी दिले. आज या गोष्टीला एक वर्ष पुर्ण होत असून अजूनही मंडळातर्फे कोणतीही बैठक आयोजित करण्यात आली नाही. त्यामुळे मंडळ ही जाहिरात काढून आमच्या अन्याय करीत आहे.

२) चुकीची जाहिरातः- या प्रसिध्द जाहिरातीत जी प्रतिक्षा यादी दर्शविण्यात आली आहे, त्यात फार मोठा गोंधळ आहे. कारण या जाहिरातीत बृहत सूची प्रतिक्षा यादीत अनेक भाडेकरु/रहिवाशी यांची नावे दोनदा आलेली आहेत. आमच्यातील एक अर्जदार श्री.शिवाजी पांडूरंग शेलार यांचा यादीत दोनदा उल्लेख हे याचे उत्तर उदाहरण आहे. तसेच प्रतिक्षा यादीत काही भाडेकरु/रहिवाशांना भूतकाळात बृहतसूचीवरील गाळे वितरण झाले असताना देखील पुन्हा एकदा त्यांचे नाव या यादीत समाविष्ट आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे श्री. गणेश रामचंद्र खैरे यांना पारसमणि टॉवर, मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग,दादर (पूर्व) येथे गाळा वितरण झाल्याचे बृहत सूची गाळा वितरण यादीवरुन दिसून येते. तसेच गाळा वितरण यादी अपूर्ण असल्याने अजूनही प्रतिक्षा

| | | | |
|---|---|---|---|
| | यादीतील काही लोकांची नावे कमी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.<br>३)जाहिरातीत रिक्त गाळयांची माहिती लपविणे- मंडळातर्फे प्रसिध्द रिक्त गाळयांच्या यादीत एनओसी विभागात अनेक रिक्त गाळयांची यादी लपविण्यात आली आहे. याचे उदाहरण म्हणजे एनओसी गाळा वितरण दुस-या यादीत ज्या पहिल्या यादीतील अर्जदारांपुढे Already allotted hence taken in next merit list" असा शेरा मारण्यात आला. त्या अर्जदारांना एनओसी गाळा वितरण पहिल्या यादीत प्रस्तावित केलेले गाळे यादीत दिसून येत नाहीत. आम्हांला कोणतेही वितरण झालेले नसताना, आम्हांला पहिल्या एनओसी गाळा वितरण यादीत न मागितलेले प्रस्तावित गाळे रिक्त असल्याची माहिती मंडळाच्या अधिका-यांनी लपविली आहे.<br>मागणी- महोदय आम्ही मंडळानेच तयार केलेल्या व जाहिरात केलेल्या एनओसी गाळा वितरण पहिली यादीतील अर्जदार आहोत. मंडळाच्या एनओसी गाळा वितरण समितीतील अधिका-यांच्या चुकीच्या धोरणामुळे तसेच त्यांच्या वर्तणुकीमुळे आम्ही आजपर्यंत आमच्या न्याय हक्कापासून वंचित आहोत. या वितरण धोरणात आम्ही मागितलेले निवासी गाळे आजही मंडळाकडे रिक्त आहेत. आपण प्रथम जाहिरात केलेल्या एनओसी गाळा पहिल्या यादीतील अर्जदारांना गाळे वितरण करावे. त्यानंतर पुढील वितरण करण्यास सुरुवात करावी. दिनांक १४/०९/२०११ च्या सुनावणीच्या वेळी अर्जदारांनी जवळपास सर्व हेच आक्षेप नोंदविले. | | |
| ६ | श्री. विकास दत्तात्रय येलूरकर<br>पत्ता : २१/१०९१, मच्छिमार नगर, रहेजा हॉस्पीटल रोड, माहिम, मुंबई- ४०० ०१६. ..यांचे दिनांक २५/०७/२०११ रोजी प्राप्त झालेले पत्र.<br>मा.सभापती (राज्यमंत्री दर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन ना हरकत गाळे वाटपाचे नियम ठरवून स्वेच्छा निर्णयात १० टक्के गाळे वाटप होऊन (जानेवारी-फेब्रुवारी २००९) राहीलेल्या ९० टक्के बृहतसूची पात्र गाळेधारकांस वितरण करण्याचे धोरण मंजुर | | प्राधिकरणाच्या दि. ०३.०३.२०११ च्या ठरावानुसार म्हाडा कायदयात बदल करण्यात आलेला नसून बृहतसूचीवरुन गाळे वितरणाच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. प्राधिकरणास तसे अधिकार आहेत. |

केले. त्याप्रमाणे अर्ज मागवून कमीटीने मन मानेल त्याप्रमाणे वाटप केले. अर्जदारांच्या मागण्यांचा विचार झाला नाही, वा त्यांच्या आक्षेपास उत्तर नाही. म्हणून न्यायालयाने या प्रकरणात निर्णय द्यावा म्हणून अपिल केले आहे. मा. सभापती ( राज्यमंत्री )यांनी ना हरकत गाळे वाटपास स्थगिती देवून नविन पॉलीसी आणण्याचा निर्णय झाल्याचे मा.उपमुख्य अधिकारी/पु.गा. यांनी न्यायालयास सांगितले.

वरील पत्र नं.२ व ३ बृहतसुची वरील पात्र गाळेधारकांस वितरण करण्याची योजना तयार करुन जाहिर केले.

वरील पत्रात प्रामुख्याने दिसून येते की, कोणत्याही गाळेधारकांस किमान देय क्षेत्रफळापेक्षा अधिक (म्हणजे ३०० चौ.फूट) क्षेत्रफळाची सदनिका वितरण करता येणार नाही. आणि तशी कृती करण्याची क्रिया चालु आहे.

२) बृहतसूचीवरील पात्र गाळेधारकांना वितरण करण्याकरीता सर्व मार्गांनी सदनिका उपलब्ध करुन (त्यामध्ये मुंबई मंडळाच्या काही सदनिका) त्या बदल्यात मोठया आकाराच्या सदनिका मंडळाकडे वर्ग करुन प्राधिकरणाच्या धोरणानुसार विक्री केल्या जातील असे म्हटले आहे. हे नियमाला धरुन नाही. यांस शासनाची मंजुरी हवी आहे. कारण विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत उपलब्ध होणा-या लहान/ मोठया मोठया सदनिका बृहतसूचीवरील पात्र गाळेधारकांस मिळण्याचा हक्क आहे. कारण वरील शासनाच्या अधिसूचनेत ३०० क्षेत्रफळापेक्षा अधिक क्षेत्रफळाची सदनिका देवून नये असे म्हटले नाही. तेच न्यायालयीन (रिट पिटीशन १६८६/९६) निर्णयात आहे. (प्रत जोडली).

३) आपली किमान देय क्षेत्रफळापेक्षा ५ टक्के अधिक क्षेत्रफळ देण्याची तरतूद आहे, असा पत्रात उल्लेख आहे. असा बदल म्हाडा कायद्यात करुन घेण्यापूर्वी शासनाची मंजुरी हवी आहे. तसे झाल्यास शासनाला त्यांच्या अधिसुचनेत बदल करावा लागेल तसेच मोठे गाळे विक्रीस शासनाची मान्यता लागेल.

8 Dy CO /R&R
२२३

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | श्री. दिपक टी. राऊत<br>पत्ता : १३४, विज्ड्स, बिजनेस सेंटर, बिर्ला मेनशन, नगीनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ०२३.यांनी श्री. मोहम्मद इरफान हुसेन काझी, जुनी चाळ मालक, यांचे तर्फे श्रीमती शालीनी कवठेकर बाबत, त्यांचे दिनांक १९/०७/२०११ रोजी प्राप्त झालेले पत्र.१९६-१९८ नरसी नाथा स्ट्रीट , सी.एस. क्रं १६९१ मांडवी डिव्हीजन ही इमारत श्रीमती कुलसुमबी हुसैन काझी यांचे नावे आहे. तसेच श्री.मोहम्मद इरफान हुसैन काझी हे श्रीमती कुलसुमबी हुसैन काझी यांचा मुलगा आहे. दिनांक ०५ जुलै , २०११ रोजी फ्रि प्रेस जर्नल या वृत्तपत्रात आलेल्या जाहिरातील प्रतिक्षा यादीमधील अनक्रमांक ५८ वर श्रीमती शालीनी कवठेकर यांचे नाव दाखवले असून हे चुकीचे आहे त्या जुनी इमारत १९६-१९८ नरसीनाथा स्ट्रीट येथील भाडेकरु नव्हत्या [सोबत भाडेकरुंची यादी] याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे. | श्रीमती शालिनी कवठेकर यांच्या नस्तीबाबत पडताळणी करणे आवश्यक वाटते. | आक्षेप घेतलेल्या जाहिरातीतील अनुक्रमांक ५८ वरील श्रीमती शालिनी कवठेकर यांचेबाबत जुन्या जागेच्या मुळ इमारत नस्तीवरुन खात्री करुन श्रीमती कवठेकर भाडेकरु/रहिवाशी नसल्याचे सिध्द झाल्यास बृहतसूचीवरुन त्यांचे नाव कमी करण्यात येईल. |

सहाय्यक विधी सल्लागार
प्राधिकरण

उपमुख्य अधिकारी (पु.गा.)
मुं.इ.दु.व पु. मंडळ

उपमुख्य अधिकारी (सं.गा.)
मुं.इ.दु.व पु. मंडळ

नि.का.अ.
मुं.इ.दु.व पु. मंडळ

सहमुख्य अधिकारी
मुं.इ.दु.व पु. मंडळ

अ/३२५